# गांधी युगातील स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांचा ऐतिहासिक मागोवा ...

**श्रेया सुरेश ढेरे**
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
shreyadhere3123@gmail.com

**घोषवारा :**

1920- 47 हा कालखंड गांधीयुग म्हणून ओळखला जातो. 1914 मध्ये गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात आल्यानंतर त्यांनी आपले सार्वजनिक कार्य सुरू केले. बालविवाह, हुंडा पद्धती, पडदा पद्धती, या अंतिमतः स्त्री विरोधी रुढी आहेत, म्हणून गांधीजींचा या प्रथांना विरोध होता. स्त्रियांच्या विषयी प्रथांवर गांधीजींनी टीका केल्या होत्या. गांधीजींनी स्त्रियांच्या जीवनाविषयी व त्यांचे प्रश्न यासंबंधी भरपूर चिंतन केले. स्वातंत्र्यलढ्याच्या मवाळ आणि जहाल युगापेक्षा गांधीयुगात स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग वाढला. हा लढा ब्रिटिश सत्तेविरुद्धचा म्हणून जितका महत्त्वाचा आहे, तितकाच शतकानुशतके घराच्या चार भिंतीच्या आत असलेल्या स्त्रियांनी प्रचंड प्रमाणावर सामाजिक अवकाशात प्रवेश करण्याचा आरंभबिंदू म्हणून महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून गांधीयुगातील स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांच्या योगदानाची चर्चा केली जाणार आहे.

**कळीचे मुद्दे** : बालविवाह, हुंडा पद्धती, पडदा पद्धती, मवाळ, जहाल, गांधीयुग इत्यादी...

**प्रस्तावना :**

1905 मधील बंगालच्या फाळणीनंतर जहालमतवादाचा प्रभाव वाढला. इंग्रज सरकारच्या दडपसरच्या धोरणामुळे जहालमतवादी विचारसरणीचा प्रभाव कमी झाला होता. महात्मा गांधींचा देशाचा राजकारणात झालेला उदय यामुळे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचे एकमुखी नेतृत्व केले. 1920 नंतर जवळजवळ 28 वर्षांच्या कालखंडात राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधींचा प्रभाव दिसून येतो. गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वामुळे भारतातील व विदेशातील अनेक स्त्रिया त्यांच्याकडे आकर्षित झाल्या होत्या. राष्ट्राच्या उन्नतीसाठी गांधीजींनी जे अनेक कार्यक्रमाचे घेतले होते, त्या विविध कार्यक्रमासहकारी म्हणून त्यांना सामील करून घेतले. गांधीजींच्या प्रेरणेमुळे शेकडो स्त्रिया घराबाहेर पडल्या व समाजसेवा करू लागल्या, अशातच त्या स्वातंत्र्य चळवळीत ही आपले योगदान देऊ लागल्या. आपल्या हस्तिदंती मनोऱ्यातून खाली उतरून सामान्य स्त्रियांमध्ये काम करण्यास त्यांनी सुशिक्षित स्त्रियांना आवाहन केले, गांधीजींनी स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली होती, परंतु स्त्रियांना आपल्या लढ्यात सामील न करून घेण्याच्या लोकांच्या वृत्तीमुळे येथील चळवळीचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत. स्वातंत्र्य लढ्यात हिरीरीने सहभाग घेतलेल्या स्त्रियांची माहिती या शोध निबंधातून आपण अभ्यासणार आहोत.

## 1. विजयालक्ष्मी पंडित

स्वातंत्र्यसेनानी पं. मोतीलाल नेहरूंच्या कन्या, पंडित नेहरू यांच्या भगिनी, युनोच्या पहिल्या महिला अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याच्या राज्यपाल, भारताच्या राजदूत अशी विविधांगी ओळख असलेल्या विजयालक्ष्मी पंडित या ख्यातनाम महिला आहेत. विजयालक्ष्मी यांचा जन्म अलाहाबादेत आनंदवन येथे 18 ऑगस्ट 1900 साली झाला. विजयालक्ष्मी या महाराष्ट्राच्या सहाव्या राज्यपाल होत्या. विजयालक्ष्मी यांच्या आईचे नाव स्वरूपराणी वडिलांचे नाव मोतीलाल होते. विजयालक्ष्मी यांचे मूळ नाव स्वरूपकुमारी नेहरू असे होते. पहिली पाच वर्ष स्वरूपकुमारी यांच्या वडिलांनी घरीच एक इंग्रज शिक्षिका नेमल्या होत्या, त्या कडक शिस्तीच्या होत्या. स्वरूप कुमारी यांचे प्राथमिक शिक्षण घरीच अध्यापिकांद्वारे झाले. नंतर त्या शिक्षणासाठी स्विझर्लंड येथे

गेल्या. भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करणाऱ्या संविधान सभेच्या भाग असलेल्या 15 महिलांपैकी विजयालक्ष्मी एक होत्या. वयाच्या 21व्या वर्षी बॅनर्जी रणजीत सिताराम पंडितांशी त्यांचा विवाह झाला. विजयालक्ष्मी व रणजित पंडित यांना तीन मुले होती. विवाहपूर्वीच विजयालक्ष्मींचा गांधीजींशी संपर्क आला होता. वडील मोतीलाल नेहरू व बंधू पंडित जवाहरलाल नेहरू देशाच्या राजकारणात व स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय होते, यांचा प्रभाव विजयालक्ष्मीवर पडणे साहजिकच होते.

**स्वातंत्र्य चळवळीतील कार्य :**

इ. स. 1930-31 च्या सविनय कायदेभंग चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. 1932 मध्ये त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. अलाहाबादच्या नगरपालिकेच्या सदस्या म्हणून त्या निवडल्या गेल्या. शिक्षण सभापतीपदही विजयालक्ष्मीकडे होते. 1937 मध्ये प्रांतीय निवडद्वारे त्या उत्तर प्रदेशातून निवडून आल्या व त्या प्रांतात विजयालक्ष्मींना मंत्रिपद मिळाले. त्या भारतात मंत्रिपद भूषवणाऱ्या पहिला महिला होत्या. 1940- 42 मध्ये ब्रिटिशांनी त्यांना तुरुंगात टाकले होते. छोडो भारत या चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. तुरूंगात त्या 9 महिने होत्या, पण त्या तुरूंगात असताना आजारी पडल्या म्हणून त्यांना सोडून देण्यात आले. विजयालक्ष्मी पंडित या संसदपटू व उत्तम वक्त्या म्हणून प्रसिद्ध आहेत. २१ विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट ही पदवी देऊन गौरविले. त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपाल म्हणून १९६२ ते १९६४ पर्यंत काम केले. १९५३ मध्ये त्या संयुक्त राष्ट्रांच्या पहिल्या महिला अध्यक्षा बनल्या. इ.स. १९६४ मध्ये त्या फूलपूर लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून निवडून आल्या

विजयालक्ष्मी पंडित या इंग्लंड, रशिया आणि मॉस्को येथे वेगवेगळ्या वेळी भारताच्या राजदूत होत्या. 1940 ते 1942 या काळात विजयालक्ष्मींनी अखिल भारतीय महिला संमेलनाचे अध्यक्षपदी भूषवले. विजयालक्ष्मी यांना भारत सरकारचा पद्मविभूषण हा पुरस्कार त्यांना मिळाला . विजयालक्ष्मी पंडित या ख्यातनाम इंग्रजी लेखिका आहेत. इंग्रजी भाषेतील त्यांचे खालील ग्रंथ गाजले.

- So I become a minister
- Prison days
- The scope of happiness

या पुस्तकांमध्ये विजय लक्ष्मी यांनी स्वतःच्या जीवनाबद्दल व त्यांचा भारताच्या राजनैतिक जीवनाबद्दल लिहिले आहे. त्यांनी स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये दिलेले योगदान त्यांना कोण कोणत्या संकटांना सामोरे जावे लागले याची माहिती या पुस्तकातून मिळते.

**स्वातंत्र्यानंतर विजयालक्ष्मी यांनी भूषवलेली पदे :**

- 1949- 52 - अमेरिका व मेक्सिको भारताच्या राजदूत
- 1953- 54 - युनोच्या महासभा या शाखेच्या अध्यक्षा
- 1953- 54- युनोच्या साधारण शाखेच्या अध्यक्षा
- 1954-64- ब्रिटनमध्ये उच्चायुक्त त्याचबरोबर स्पेन व आयर्लंडच्या राजदूत
- 1962-64 - महाराष्ट्राच्या राज्यपाल

गांधीजींच्या प्रभावामुळे त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभाग घेण्यास आरंभ केला, त्यांनी स्वातंत्र्याच्या प्रत्येक आंदोलनामध्ये व चळवळीमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. 1968 मध्ये त्यांनी लोकसभेचा राजीनामा दिला व राजकारणातून नियुक्ती घेतली.

विजयालक्ष्मी पंडित यांचा भारत आणि परदेशातील अनेक महिला गटांमध्ये सहभाग होता. काही वर्षापासून त्यांनी केंद्रातील काँग्रेस सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. विजयालक्ष्मी पंडित यांचे 1990 मध्ये निधन झाले.

**कस्तुरबा मोहनदास गांधी**

स्वातंत्र्य लढ्यातील दुसऱ्या महत्त्वाच्या महिला म्हणजे कस्तुरबा गांधी होत. महात्मा गांधीजींच्या बरोबरीने त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढत सहभाग घेतला होता.

कस्तुरबा गांधी यांचा जन्म 11 एप्रिल 1869 रोजी गोकुळदास माखजी या पोरबंदर येथील श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरी झाला. कस्तुरबांचा विवाह मोहनदास करमचंद गांधी यांच्याशी झाला. लग्नाच्या वेळी दोघांचेही वय 13 वर्षे होते. लग्नसमयी त्या निरक्षर होत्या. त्यांना गांधीजींनी लिहायला व वाचायला शिकवले. त्यावेळच्या स्त्रियांच्या स्थितीचा विचार करता ही एक धक्कादायक गोष्ट होती. 1888 साली जेव्हा गांधीजी विद्याभ्यासासाठी लंडन येथे गेले, तेव्हा कस्तुरबा तान्हुल्या हरिलालचे संगोपन करण्यासाठी भारतातच राहिल्या. त्यांना आणखी तीन मुले होती- मणिलाल (जन्म ) इ.स. 1892, रामदास (जन्म : इ.स. 1897) आणि देवदास (जन्म : इ.स. 1900). 1930 मध्ये कस्तुरबांच्या नेतृत्वाखाली ठाण्याजवळ कळवे येथे स्त्रियांना सत्याग्रह केला, गोलमेज परिषदेसाठी त्या गांधीजींबरोबर इंग्लंडला गेल्या होत्या. १९०६ साली गांधीजींनी ब्रम्हचर्य पालनाचा निर्णय घेतला. कस्तुरबांनी या निर्णयास खंबीर साथ दिली. गांधीजींचे अनेक निर्णय त्यांना पटत नसत. एखादी कल्पना त्यांच्या गळी उतरवण्यासाठी गांधीजींना बरेच परिश्रम पडत. असे असूनही गांधीजींच्या प्रत्येक निर्णयात त्या त्यांच्याबरोबर असूनही गांधीजींच्या प्रत्येक निर्णयात त्या त्यांच्याबरोबर राहिल्या. त्या खूप धार्मिक होत्या. असे असूनही, आपल्या पतीप्रमाणेच त्यांनी जातिभेदाचा त्याग केला व सर्व जातिधर्मांच्या लोकांबरोबर त्या आश्रमात राहिल्या.

कस्तुरबा गांधींनी पतीच्या राजकीय कार्यात सक्रिय सहभाग घेतला.१८९७ साली त्या गांधीजीबरोबर राहण्यासाठी दक्षिण आफ्रिकेस गेल्या. १९०४-१९१२ दरम्यान त्या डर्बन शहराजवळील फिनिक्स वसाहतीमध्ये समाजकार्यात मग्न होत्या. १९१३ मधील भारतीय मजुरांच्या शोषणाविरोधातील चळवळीत त्यांना ३ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. त्या महात्माजींच्या तुरुंगवासाच्या काळात त्यांनी भारतामध्ये चळवळीचे कार्य सांभाळले. १९९५ मध्ये गांधीजी निळीचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सत्याग्रहासाठी जेव्हा परतले, तेव्हा कस्तुरबाही त्यांच्याबरोबर भारतात आल्या. त्यांनी या शेतकऱ्यांच्या बायका आणि मुलांना साक्षरता आणि स्वच्छतेचे धडे दिले. काही वेळा तर त्या महात्मा गांधीजींना पण सल्ला द्यायला मागे पुढे झाल्या नाहीत. महात्मा गांधी म्हणायचे की, जेवढे लोक माझ्या आणि कस्तुरबा यांच्या संपर्कात आहेत त्यातील जास्तीत जास्त लोकांची कस्तुरबा यांच्यावर श्रद्धा आहे. त्यांनी आपले संपूर्ण जीवन आपले पती महात्मा गांधी आणि देश यांच्यासाठी व्यतीत केले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी कस्तुरबा गांधी यांचे बहुमूल्य योगदान आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो हे कस्तुरबांनी सिद्ध करून दाखवले व त्याप्रमाणे गांधीजींना साथ सुद्धा दिली. स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये पतीच्या मार्गावर चालणे हे जणू त्यांचे ध्येयच होते, हे यातून दिसून येते.

दक्षिण आफ्रिकेतील कार्यामुळे गांधीजींची ओळख व्हायला लागली. पण या कामात त्यांना कस्तुरबांची साथ महत्वाची राहिली आहे. सार्वजनिक जीवनाचा प्रयोग एकांगी यशस्वी होऊ शकत नाही याची जाणीव बापूंना होती. त्यासाठी त्यांनी बांना तयार करायला सुरूवात केली. बा कट्टर धार्मिक होत्या. परंपरा जपणाऱ्या होत्या. १९१५ मध्ये गांधीजी निळीचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सत्याग्रहासाठी जेव्हा परतले, तेव्हा कस्तुरबाही त्यांच्याबरोबर भारतात आल्या. कस्तुरबा गांधी यांनी गांधीजींना विविध चळवळींमध्ये आंदोलनामध्ये सत्याग्रहामध्ये मोलाची साथ दिली. भारत छोडो आंदोलनच्या वेळेला इंग्रज सरकारने महात्मा गांधी आणि काँग्रेसच्या नेत्यांना 9 ऑगस्ट 1942 ला अटक केली. महात्मा गांधी यांच्या अनुपस्थिती कस्तुरबा गांधी यांनी मुंबईच्या शिवाजी पार्क मध्ये भाषण करण्याचा निर्णय घेतला. पण तिथे पोचल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली त्यावेळी त्या पार्कमध्ये एक लाखापेक्षा जास्त लोक उभे होते. त्यांना अटक होताना पाहून लोक खूप अडकले होते. कस्तुरबा गांधी यांना बॉम्बे ऑर्थररोड जेलमध्ये पाठवण्यात आले. पण तो जेल अस्वच्छ असल्यामुळे त्यां सारख्या आजारी पडू लागल्या. म्हणून त्यांना पुण्याच्या आगा खा महलमध्ये पाठवण्यात आले. गांधीजीनाही तिथे ठेवण्यात आले होते. अटक झाल्यानंतर त्यांची तब्येत बिघडत होती त्यांच्यामध्ये काही सुधारणा होत नव्हती.

जानेवारी 1944 मध्ये कस्तुरबा गांधी यांना दोन वेळा हृदयविकाराचा त्रास झाला. सरकारने त्यांच्यासाठी आयुर्वेदिक डॉक्टरची सोय केली. त्यामुळे त्यांना थोड्यावेळासाठी आराम भेटला पण 22 फेब्रुवारी 1944 ला परत हृदयविकाराचा त्रास चालू

झाला. आणि त्यावेळी कस्तुरबा गांधी यांचे निधन झाले. कस्तुरबा गांधींनी भारताला स्वातंत्र मिळवून देण्याचे गांधीजींचे स्वप्न पूर्ण करण्यास आपले योगदान दिले होते.

**निष्कर्ष :**

आपल्या संस्कृतीमध्ये जे-जे काही चांगले, पवित्र, उदात्त आहे ते सर्व स्त्रियांच्या सहभागाने साध्य झालेले आहे. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनी जास्त प्रमाणात केली आहे; परंतु हे घडत असताना स्त्रियांवर अन्याय झाला आहे. कुटुंब व्यवस्था टिकवण्यासाठी आणि सांस्कृतिक मूल्य-संवर्धनासाठी स्त्रियांनीच मोठ्या प्रमाणावर त्याग केला आहे. याबाबत पुरुषांचा वाटा नगण्य आहे. स्त्रियांवर जबाबदाऱ्या लादून समाजसंस्कृती संवर्धन करण्याच्या प्रक्रियेत त्यांच्यावर अन्याय झाला आहे. तो त्यांनी सहन केला तरच सांस्कृतिक मूल्ये टिकणार, हे म्हणणे योग्य नाही. स्त्रियांनी अन्याय सहन करण्याचे नाकारले किंवा त्यांनी न्यायाच्या वाटेने जायचे ठरवले तर जी काही सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये कोलमडून पडतील ती खरी मूल्ये नव्हती, हे आपण मान्य केले पाहिजे. कारण तो समाजाच्या एका घटकाने दुसऱ्या घटकाच्या शोषणातून व गुलामगिरीतून मिळवलेला गैरवाजवी सामाजिक फायदा ठरतो. जी स्त्री सुशिक्षित होईल आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे आर्थिक स्वायत्तता मिळवेल, ती अन्यायाचे जोखड फेकूनच देणार हे तर महात्मा फुलेंनी सांगितलेले आहे.

वरील शोधनिबंधातून असे दिसून येते की स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांवर गांधीजींच्या विचारांचा पगडा होता. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणाऱ्या स्त्रिया या गांधीजींच्या मार्गावर व त्यांनी सांगितलेल्या मूलतत्त्वांचा स्वीकार करत भारतीय स्वातंत्र्य लढ्यात स्वातंत्र्य मिळवण्यासाठी एकत्र आल्या. अशा अनेक स्त्री क्रांतिकारक व स्वातंत्र्यसैनिकांमुळे भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले असे म्हणावे लागेल.

**संदर्भ:**

1. करकरे कुमुद (१९७८), स्त्रीमुक्ती चळवळ, समाजवादी महिला सभा, पुणे.
2. प्रा. कोंडेकर ए. वाय. (१९८७), भारतीय समाजाचा परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर
3. गांधी नंदिता, शाह नंदिता (१९९४), स्त्री संघर्षाची नवी रूपे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.